


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे अंक : ६१४ . वा बुधवार दि. २९ नोव्हेंबर २०२३ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# बुलढाणा महसूल विभागात मोठ्या प्रमाणात होतो भेदभाव!

## एकाच गुन्ह्यासाठी अधिकाऱ्यांना लागतो वेगवेगळा न्याय...

**जनसंचलन/ बुलढाणा**

येथील महसूल विभागाचे कामकाज म्हणजे सध्या एक मोठा विनोदच बनला आहे. भ्रष्टाचाऱ्यांचे रक्षण करणारे खाते म्हणून बुलढाणा महसूल विभाग आता कुप्रसिद्ध होऊ लागला आहे. विशेष म्हणजे या एकाच गुन्ह्यासाठी वेगवेगळ्या अधिकाऱ्यांना वेगवेगळा न्याय लागतो. मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्या प्रकरणावरून तर पूर्णपणे स्पष्ट आहे. प्रचंड भ्रष्टाचाराचे खाऊन सुद्धा टेकाळेंवर कारवाई नाही, मात्र टेकाळेंसारखाच नियमभंग करणाऱ्या दुसऱ्या अधिकाऱ्यांवर मात्र कारवाईची कुऱ्हाड कोसळल्याने याबाबत आता महसूल विभागातील अधिकाऱ्यांमध्ये रोष निर्माण होत आहे. बुलढाण्याचे बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनी कशाप्रकारे महाभ्रष्टाचार केला, कशाप्रकारे त्यांनी शासनाचा महसूल बुडवला, कशाप्रकारे त्यांनी स्वतःची कोट्यवधींची अवैध संपत्ती / अपसंपदा जमवली, कशाप्रकारे अनेकांची लुबाडणूक केली आणि हे सर्व काही करून त्यांच्यावर कारवाई का होत नाही, या सर्व विषयांसंदर्भात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने सातत्याने प्रकाश टाकलेला आहे. आजवर जेव्हढा भंडाफोड दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने टेकाळे यांचा भ्रष्टाचार आणि महसूल विभागात माजलेला गलथान कारभार यावर केलेला आहे, तेव्हढा इतिहासातही कोणी केलेला नसावा. महसूल विभागाच्या या नालायक आणि भ्रष्ट कारभारावर नेमकेपणाने बोट ठेवण्याचे काम सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ने आजवर केलेले आहे. एव्हढे करून सुद्धा महसूल विभागाचा कारभार अजिबात सुधारण्याच्या स्थितीत दिसून येत नाही. महाभ्रष्टाचारी महाठग असलेल्या विजय दत्तात्रय टेकाळे यांच्यावर खरे तर बडतर्फी आणि फौजदारी कारवाईची तात्काळ गरज आहे, त्या व्यक्तीला सातत्याने वाचवण्याचे काम महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी करीत आहेत. कोणीही टेकाळेंवर कारवाई करण्याच्या मनःस्थितीत नसल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. टेकाळे यांनी जे ५२ अनोंदणीकृत फेरफार नियमित केल्याचा गंभीर प्रकार केला आहे, तसाच प्रकार हिवरा येथील मंडळ अधिकाऱ्यांनीही केला होता. त्यांच्या या कृतीवर तात्काळ चौकशी होऊन त्यांच्यावर कारवाई ही झाली. परंतु टेकाळे यांच्यावर कारवाईच्या नावाने शंख आहे. कदाचित हिवरा येथील मंडळ अधिकाऱ्यांनी केलेली अनियमितता ही टेकाळे यांच्यापेक्षा अनेक पटींनी कमी किंवा मवाळही असेल. परंतु तेथे कारवाई. टेकाळेंना मात्र पुन्हा अनिर्बंध भ्रष्टाचार करण्यास सुट मिळते. टेकाळे यांचा कोणताही गुन्हा, कोणताही प्रमाद, कोणताही नियमभंग हा महसूलच्या अधिकाऱ्यांना दिसतच नाही. मसूलचे अधिकारी टेकाळेंच्या बाबतीत अक्षरशः धृतराष्ट्र बनल्याचे आपल्याला स्पष्टपणे दिसून येते. टेकाळेंना वाचवण्यासाठी तर बुलढाण्याचे तहसीलदार हे सर्वांत आघाडीवर असतात. ते टेकाळेंना वाचवण्यासाठी आपल्या पदाचीही बाजी लावायला तयार असल्याचे दिसते. कारण सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने टेकाळे यांच्या अवैध संपत्तीची संपूर्ण कागदपत्रे तहसीलदार खंडारे यांना प्रदान केली होती. त्यानंतरही खंडारे यांनी टेकाळेंवरील आपला अहवाल सादर करताना त्यात टेकाळेंच्या बचावाचा आटोकाट प्रयत्न केल्याचे दिसते. हा उपविभागीय अधिकारी, ना अतिरिक्त जिल्हाधिकारी, ना निवासी उपजिल्हाधिकारी, ना जिल्हाधिकारी. कोणीही टेकाळेंवर कारवाई करण्याबाबत तत्पर दिसून येत नाही. तत्कालीन जिल्हाधिकारी तुम्मोड हे तर टेकाळेंवर कारवाई करण्याबाबत इतके हतबल आणि लाचार दिसून आले की, साधी टेकाळे यांची बदली करण्यासाठी त्यांनी चक्क महसूल आयुक्तांकडून सल्ला मागितला होता. एका महाभ्रष्टाचारी महाठगासमोर अख्खेच्या अख्खे महसूल खाते इतके लाचार का होत आहे, हा सर्वांत मोठा प्रश्न आहे. खरे तर टेकाळे यांच्या भ्रष्टाचाराबाबत आज सर्व महसूल विभाग पूर्णपणे ज्ञात आहे. महसूल खात्यात मोठ्या प्रमाणात दबक्या आवाजात चर्चा आहे की, टेकाळे यांनी काही अधिकाऱ्यांनाही आपल्या भ्रष्टाचारात सामील करून घेतलेले आहे, त्यामुळेच टेकाळे




मंडळ अधिकारी विजयदत्तात्रय टेकाळे

**बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनी केलेला भ्रष्टाचार व त्यातून कमवलेली करोडो रुपयांची अपसंपदा नातेवाईकांसोबत शहरातील मोठे व्यापारी शेकडो सातबारे विभागीय चौकशी सुरू असतांना शहरातील नियमबाह्य केलेले १०२ प्लॉट व यापूर्वी तक्रारत्यांनी दिलेल्या तक्रारींवर समितीने टेकाळे विरोधात दिलेला अहवाल कित्येक वर्षांपासून मुख्यालयी ठिकाणीच आपले बस्तान मांडून बसलेल्या टेकाळेंचा व त्यांच्या भ्रष्टचारावर व नियमबाह्य कामावर संबंधित अधिकाऱ्यांची ही पोलखोल पुढील प्रत्येक सत्रात...**

हे अक्षरशः अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करतात. त्यामुळेच त्यांच्यावर कारवाई होत नाही. एव्हढेच नाही तर बदलीचा आदेश निघून देखील टेकाळे हे आपला विद्यमान चार्ज सोडायला तयार नाहीत. यावरून टेकाळे यांची मुजोरी आणि मग्रुरी किती अत्युच्च पातळीला गेलेली आहे, हे स्पष्ट होते. आजवर भलेही टेकाळे यांना वाचवण्याचे मोठ्या प्रमाणात प्रयत्न झाले असतील, परंतु विद्यमान जिल्हाधिकारी किरण पाटील यांच्याकडून असल्या भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाईची अपेक्षा आहे. किमान जिल्हाधिकारी पाटील यांनी या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून टेकाळे यांची अवैध संपत्ती सरकारजमा करावी, भ्रष्टाचार प्रकरणी टेकाळेंवर फौजदारी कारवाई करावी टेकाळे यांना तात्काळ गजाआड करावे. असे झाल्यास महसूल विभागातील ही भ्रष्टाचाराची कीड निपटून काढता येईल. अन्यथा ही कीड एक दिवस संपूर्ण महसूल विभागाला पोखरल्याशिवाय राहणार नाही. तो दिवस येऊ नये, म्हणून दैनिक जनसंचलन व सिटी न्युज अशा भ्रष्टाचाऱ्यांच्या विरोधात आसूड ओढल्याशिवाय राहणार नाही, हे निश्चित

# भरधाव दुचाकीची लिंबाच्या झाडाला धडक,भीषण अपघातात एकजण जागीच ठार...

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलडाणा जिल्ह्यातील धामणगाव बढे येथून जवळच असलेल्या रोहिणखेड येथील बारागाव पाणीपुरवठा योजनेच्या पाण्याच्या टाकीजवळ आज रविवारी सकाळी ९:३० वाजेच्या सुमारास भीषण अपघात झाला. एमएच २८ बीएन ९६२९ क्रमांकाच्या मोटरसायकलने लिंबाच्या झाडाला जोरदार धडक दिली. यामध्ये एक तरुण जागीच ठार झाला असल्याची माहिती आहे. तर दोघे गंभीररित्या जखमी आहेत. तिघेही एकाच मोटारसायकलवर धामणगाव बढेच्या दिशेने जात होते. जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवण्यात आले असून पुढील तपासासाठी धामणगाव बढे पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुखदेव भोरकडे घटनास्थळी पोहोचले आहे. मागील काही दिवसापासून जिल्ह्यातील दूचाकी चे मुख्यतः अपघाताचे प्रमाण वाढले आहे.सुसाट अनियंत्रित वेग यामुळे सदर अपघाताचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. अनेकवेळा समाज माध्यमातून रस्ते वाहतूकतिच्या बाबत सूचना दिशा निर्देश दिलेले असतात. पण सुसाट वेग अनियंत्रित वाहन चालवण्याच्या स्पर्धा यामुळे हे अपघात होत आहे. या अपघातांमध्ये दूचाकीचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. मुख्यतः या दुचाकी अपघातामध्ये युवक वर्गाचं प्रमाण वाढत असल्याच्या घटना समोर येत आहे. जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर केव्हा अपघात होईल हे सांगता येत नाही. पण आता जिल्ह्यातील सुसाट झालेले शहरी रस्ते, ग्रामीण भागात विस्तारित होत चाललेले रस्त्याचे जाळे यामध्ये अपघा-ताचे प्रमाण वाढत चाललं आहे, असं म्हटलं तर वावगे ठरणार नाही.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाणा जिल्ह्याचे लोकप्रिय दैनिक निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहारी जनसंचलनच्या विशेष दिपावली अंकाचे वाचक वर्गाच्या हस्ते विमोचन...



# बीआरएसच्या माध्यमातून केवळ एका कुटुंबाचे भले तेलंगाणाच्या जनतेला सोडले वाऱ्यावर : देवेंद्र फडणवीस

## ४ राज्यात २२ प्रचारसभा आणि रोड शो...

वृत्तसंस्था/तेलंगाणा

तेलंगणातील बीआरएस सरकारने केवळ एका कुटुंबाचे भले केले, प्रचंड भ्रष्टाचारातून घर भरले आणि जनतेला वार्यावर सोडून दिले. तेलंगणाचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी भाजपालाच मतदान करा, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज प्रचाराच्या शेवटच्या दिवशी केले. तेलंगणातील प्रचाराच्या शेवटच्या दिवशी त्यांच्या आज देवरकोंडा, पालाकुर्ती आणि नरसामपेट मतदारसंघात रोड शो आणि प्रचारसभा झाल्या. यावेळी बोलताना ते म्हणाले की, तेलंगणाने भ्रष्टाचार, दुराचाराची १० वर्ष अनुभवली आहेत. तेलंगणाचे सरकार केवळ एका कुटुंबासाठी काम करते आहे. एका कुटुंबाला रोजगार मिळाला आणि त्यांचेच केवळ भले झाले. बीआरएस आणि काँग्रेस हे एकच आहेत. ते सोबत येऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हरवू पाहत आहेत. त्यामुळे आता केवळ भाजपालाच निवडून द्या. भाजपा सत्तेत आल्यानंतर आतापर्यंतच्या सर्व घोटाळ्यांची चौकशी करुन दोषी आढळणार्यांना कठोर शिक्षा करण्यात येईल. तेलंगणामध्ये भाजपा ओबीसी मुख्यमंत्री देणार आहे. धर्माच्या आधारावर देण्यात आलेले आरक्षण बंद



करुन ते एससी, एसटी, ओबीसींना देण्यात येईल. घरात मुलीचा जन्म झाल्यानंतर ती २१ वर्षांची होताच तिला २ लाख रुपये देण्यात येईल. गरिबांना आवास पट्टे देण्यात येईल. तेलंगणाला जेव्हा पाण्याची गरज होती, तेव्हा आम्ही पाणी दिले. मेडिगट्टा प्रकल्पाला मदत केली. पण, त्यातही इतका भ्रष्टाचार झाला की तीनच वर्षांत त्याला तडे गेले. संपूर्ण पैसा तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांनी स्वत:च्या तिजोरीत टाकला, असा आरोप देवेंद्र फडणवीस यांनी केला. ४ राज्यात २२ सभा/रोडशो चार राज्यातील विधानसभा निवडणुकीदरम्यान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुमारे ८ ते ९ दिवस विविध राज्यात प्रचार केला. १८ सप्टेंबर आणि १० तसेच १५ नोव्हेंबर या काळात त्यांनी मध्यप्रदेशात धार, इंदोर, महू, बुरहानपूर, पांढुर्णा, सौंसर इत्यादी ठिकाणी प्रचार केला. ३० ऑक्टोबर रोजी छत्तीसगडच्या दौर्यावर असताना धमतरी, रायपूर येथे रोड शो आणि प्रचारसभा घेतला. १४ सप्टेंबर आणि २३ नोव्हेंबर रोजी राजस्थानच्या दौर्यावर असताना त्यांनी केसरी, नासिराबाद, किशनगड, अजमेर उत्तर, सांगानेर, आदर्शनगर येथे एकूण ७ सभा घेतल्या. तेलंगणात त्यांनी २१ आणि २८ नोव्हेंबर रोजी डोमलगौडा, हैदराबाद येथे रोड शो घेतले, तर नरसामपेट, देवलकोंडा, पालाकुर्ती येथे सभा आणि रोडशो केले.

# गळफास घेऊन शेतकऱ्याची आत्महत्या...



जनसंचलन/ चिखली

सततची नापीकि डोक्यावर कर्जाचा डोंगर मुलांची शिक्षण कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न असह्य झाल्याने शेतकऱ्यांनी कंटाळून स्वतःच्या शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली. शाम हरीदास कापसे ३५ वर्षीय शेतकऱ्याने कर्जाला कंटाळून निंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. सदर घटना चिखली तालुक्यातील पळसखेड सपकाळ येथे २५ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजे सुमारास उघडकीस आली. पळसखेड सपकाळ येथील शेतकरी शाम हरिदास कापसे वय ३५ वर्ष हे २४ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास शेतातील पिकांना पाणी देण्यासाठी गेले होते ते घरी परत आले नाही. म्हणून त्यांचा २५ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता शोध घेतला असता त्यांची बलखेड शिवारातील गट नंबर ८ मध्ये स्वतःच्या शेतातील निंबाच्या झाडाला गळफास घेतल्याचे अवस्थेत लटकलेले प्रेत दिसून आले अशी फिर्याद राधेश्याम देवराव काळे वय ४० वर्षे रा. पळसखेड सपकाळ यांनी अमडापूर पोलीस स्टेशनला दिली असून यावरून अमडापुर पोलिसांनी कलम १७४ सी.आर. पी.सी नुसार मर्ग दाखल केला आहे. पुढील तपास ठाणेदार सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अमडापूर पोलीस करीत आहेत. सदर मृतक शेतकरी शाम कापसे यांचेकडे ४ एकर शेती असून भारतीय स्टेट बैंक शाखा शेलसुरचे पीक कर्ज १ लाख रुपये व बालाजी अर्बन पतसंस्था चिखली यांचे ४ लाख रुपये असे एकूण ५ लाख रुपये थकीत कर्ज असून इतरही कर्ज असल्याची माहिती हरिदास कापसे यांनी दिली. श्याम कापसे यांच्या पश्चात पत्नी दोन मुले म्हातारे आई-वडील दोन भाऊ असा मोठा परिवार आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## संविधानामुळे देश एकसंघ राहिला- सुनील सपकाळ

जनसंचलन/बुलढाणा



संविधानाने मी ऐवजी आम्ही म्हणायला शिकवीले. आम्ही भारतीय लोक अशी सुरुवात करून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी समता ,स्वातंत्र्य, न्याय व बंधुता ही मुलतत्वे दिली. संविधाना आहे म्हणून देश एकसंघ राहिला आहे. असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते व शिवजयंती उत्सव समितीचे सचिव सुनील सपकाळ यांनी २६ नोव्हेंबर २०२३ रोजी केले. सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती कार्यालयात संविधान दिन, सव्वीस अकराचे हल्ल्यात शहीद झालेल्या शहिदांना अभिवादन तसेच ज्येष्ठ पत्रकार व महाराष्ट्रास वैचारिक दिशा देणारे विचारवंत प्रबोधनकार ठाकरे यांना अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांनी उद्देशिकेचे पूजन केले. यावेळी प्राध्यापक अमोल वानखेडे यांनी उद्देशिकेचे वाचन करून एकनिष्ठतेची शपथ दिली. पुढे बोलताना सुनील सपकाळ म्हणाले --आज संविधान दिवस आहे. तसा २६ /११ हल्ल्याचे स्मरण दिवसही आहे. याच दिवशी मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला होता. हा हल्ला परतून लावताना हेमंत करकरे, साळस्कर ,कृष्ण उनियन ,अशोक कामटे, तुकाराम ओम्बळे,शहीद झाले. या शहिदांचे स्मरण करून त्यांनी अभिवादन केले. ज्येष्ठ पत्रकार व प्रबोधनकार ठाकरे यांच्या विषयी बोलताना सुनील सपकाळ यांनी महाराष्ट्राला वैचारिक वळण लावणारा पत्रकार असे वर्णन केले. प्रबोधनकार ठाकरे यांच्या कार्याची त्यांनी सविस्तर माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात डॉक्टर शोण चिंचोले यांनी आयोजनामागची भूमिका विशद केली. संविधान देशाचा सर्वोत्कृष्ट ग्रंथ असून संविधानामुळे प्रत्येकाच्या हक्काचे संवर्धन होत असल्याचे सांगितले. यावेळी विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तींचा त्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यामध्ये पत्रकार लक्ष्मीकांत बगाडे, डॉक्टर सौ काळे, दिनकरराव चिंचोले, रिया पाटील यांचा शिव सन्मानपत्र व शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. संचालन व आभार प्राध्यापक अमोल वानखेडे यांनी मानले.

# वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस जिल्ह्यात शेतीचं प्रचंड नुकसान

जनसंचलन/बुलढाणा



जिल्ह्यातील सिंदखेडराजा,देऊळगाव राजा, लोणार तालुक्यात रात्रीपासून मुसळधार पावसासह गारपीट झाली आहे. अवकाळी पावसासह गारपीट झाल्यानं शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले.या नुकसानाची माहिती मिळताच खासदार प्रतापराव जाधव यांनी पहाटेच शेतकऱ्यांच्या बांधावर धाव घेत नुकसानीची पाहणी केली. अधिकाऱ्यांना बोलावून त्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. आज सिंदखेडराजा तालुक्यातील पळसखेड चक्का,माळ सावरगाव येथील शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन प्रतापराव जाधव यांनी पाहणी केली. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. नेट शेड, भाजीपाला, तुर, गहू, हरभरा पिकांच्या शेतात पाणी साचलेले आहे तर कुठे गारांचा थर असल्याचे थर असल्याचे जाधव यांनी सांगितले.पळसखेड चक्का हे गारपीट होण्याचं केंद्र बनलं आहे. शेतकऱ्यांनी जवळपास १५ किलोंची गार हात धरली आहे, असं आपण पाहतोय. या ठिकाणी असलेले शेतकरी शेडनेटच्या माध्यमातून बीजोत्पादन करत असतात. गारपीट झाल्यानं आणि वाऱ्यामुळं त्याचं नुकसान झालं आहे. गारपीट झाल्यानं टॉमेटोचं नुकसान झालंय. कापसाचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. शेतकऱ्यांची जी पिकं शेतात होती त्यांचं जवळपास १०० टक्के नुकसान झालं, आहे, असं प्रतापराव जाधव म्हणाले आहेत. प्रतापराव जाधव यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी यांना तातडीने आजच्या आज पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी संबधित अधिकाऱ्यांना जाधव यांनी नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर बोलवून घेत आवश्यक त्या सूचना दिल्या. कोणताही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही यासाठी निर्दोष पंचनामे करा. त्याची एक प्रत ग्रामपंचायत कार्यालयावर लावा अशा सूचना यावेळी जाधव यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. शासनदरबारी पाठपुरावा करून नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देणार असल्याचे त्यांनी यावेळी प्रसारमाध्यमांसोबत बोलताना सांगितले.बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथे रविवारी रात्री सुरू झालेला पाऊस सकाळपर्यंत देखील कमी जास्त प्रमाणात सुरूच होता. जवळपास ४४.४ मिलिमीटर पेक्षा जास्त पावसाची नोंद झाली होती. त्यामुळे हिवाळ्याच्या दिवसात पावसाळ्याप्रमाणे अवकाळी पाऊस बरसत असल्याने बळीराजा चिंतेत आला आहे.

## गुटखा विक्री विरोधात अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई

जनसंचलन/बुलढाणा

नांदुरा येथे जळगाव जमोद रोडवरील विशाल जैन यांच्या गोदामावर अन्न व औषध प्रशासनाच्या अन्न सुरक्षा अधिकारी सोळंके व गुप्त वार्ता विभागाचे अन्न सुरक्षा अधिकारी संदिप सुर्यवंशी, अजाबराव घेवंदे, नमुना सहायक आशिष देशमुख यांच्या पथकाने छापा मारुन १ लक्ष ६२ हजार ८०० रुपये किंमतीचा पानमसाला व सुंगधीत तंबाखूचा साठा जप्त केला. राज्यात गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखू, सुपारी व तत्सम तंबाखुजन्य पदार्थाविरुद्ध प्रतिबंध घालण्यात आला आहे. अन्न व औषध प्रशासन मंत्री राजे धर्मरावबाबा अत्राम तसेच अन्न सुरक्षा आयुक्त अभिमन्यू काळे यांच्या निर्देशानुसार राज्यात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधीत अन्नपदार्थ विक्रीविरुद्ध मोहीम राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने बुलडाणा जिल्ह्यात दोन ठिकाणी प्रतिबंधीत अन्न पदार्थ विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणी नांदुरा पोलीस स्टेशनमध्ये भा.दं.वि. कलम १८८,२७३ व ३२८ तसेच अन्न सुरक्षा मानदे कायद्याच्या कलम ५९ नुसार आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. दुसऱ्या प्रकरणीमध्ये दसरखेड, टोलनाका, मलकापूर, गाडी क्र. एमएच २१, बीएच १५ गाडीची तापडीया रा. रिसोड, जि. वाशिम या दोषीविरुद्ध एमआयडीसी पोलीस स्टेशन, दसरखेड, येथे भा.दं. वि. कलम १८८, २७३ व ३२८, अन्न सुरक्षा व मानदे कायदा कलम ५९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. दोन्ही कारवाईत अमरावती विभागाचे सह आयुक्त (अन्न) ग.सु. परळीकर व सहायक आयुक्त स.द. केदारे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.

## संविधान दिना निमित्य आदिवासी प्रोबोधन मेळावा हक्क परिषद संपन्न

# संविधानामुळेच आदिवासीना जगण्याचा अधिकार मिळाला-प्रदेशाध्यक्षा नंदिनीताई टारपे

जनसंचलन/ बुलडाणा

आखिल भारतीय आदिवासी विकास परिषद नवी दिल्ली महाराष्ट्र शाखा द्वारा भगवान बिरसा मुंडा जयंती व भारतीय संविधान दीना निमित्य परतवाडा येथे दिनांक २६ नोव्हेंबर रोजी आदिवासी प्रोबोधन मेळावा हक्क परिषद तथा भव्य रैली आयोजित करण्यात आली होती. भारतीय संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी अस्तित्वात आले आहे, त्यानुसार राज्यकारभार चालविण्यासाठी काही विशिष्ट बाबी भारतीय नागरिकांना बहाल करण्यात आल्या देत्यात प्रामुख्याने सामाजिक आर्थिक व राजकीय न्याय मिळण्याची तरतूद केली.तसेच नागरिकांना सार्वभौम, समाजवादी,धर्मनिरपेक्षा, लोकशाही राज्यकारभार चालवीने आपली विचार व्यक्त करण्याची व श्रद्धेप्रमाणे उपासना कोणत्याही धर्माची शिकवण दिल्या जाण्यासाठी मुभा दिली आहे. प्रत्येक व्यक्तीला समाजात दर्जा आणि संधीची सर्वांना समानता प्रदान करण्यात आली. आणि एक व्यक्ती म्हणून त्याची प्रतिष्ठा जपने आवश्यक असल्याने राष्ट्रीय एकता आणि एकात्मता या गोष्टींना महत्व देत एक सर्व समावेशक राज्यकारभार चालावा यासाठी भारताच्या संविधान सभेने भारतीय संविधान अस्तित्वात आणले. देशात व महाराष्ट्रात आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात असून स्वातंत्र्य पूर्व काळात आदिवासी समाजावर होत असलेल्या अन्याय व अत्याचारच्या विरोधात महामानव बिरसा मुंडानी उलगुलान च्या नाऱ्याखाली आदिवासी समाजाला संघटित करून इंग्रजाला सळोकी पळो करूण सोडले होते अशा महान क्रांती कारची जयंती व भारतीय संविधान दीनाचे औचित्य साधून परतवाडा जि. अमरावती येथे आदिवासी समाज प्रोबोधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मंत्री शिवाजीराव मोघे होते, उदघाटक म्हणून मा. बिरसा क्रांती दलाचे राष्टीय अध्यक्ष दशरथ मडावी होते तसेच प्रमुख पाहुणे म्हणून झारखंडच्या माजी मंत्री तथा महिला परिषदेच्या राष्ट्रीय अध्यक्ष मा. गिताश्री उरावं व महराष्ट्र प्रदेश महिला अध्यक्ष नंदिनीताई टारपे होत्या.स्वागतअध्यक्ष परिषदेचे प्रदेशाध्यक्ष रामसाहेब चव्हाण होते,यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. शिवाजीराव मोघे



म्हणाले की देशामध्ये आता आदिवासीची लोकसंख्या वाढली असून ९ टक्के आदिवासी रिझर्वेक्षण दिले पाहिजे तसेच फोर्स मध्ये आदिवासी रेजिमेंट झाली पाहिजे आशा विविध मागण्या केल्या तसेच कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या नंदिनीताई टारपे यांनीआपल्या भाषानातून बिरसा मुंडा यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकून संविधान टिकवायाचे असेल तर आदिवासींनी संघटित होणे काळाची गरज आहे, तसेच संविधानमुळेच दऱ्या खोऱ्यात राहणाऱ्या आदिवासी समाजाला जगण्याचा अधिकार मिळाला आहे, यावेळी प्रास्ताविक भाषण परिषदेचे प्रदेशाध्यक्ष रामसाहेब चव्हाण यांनी केले. तसेच झारखंड च्या माजी मंत्री गिताश्री उरावं यांनी सुद्धा आपल्या भाषणातून विचार मांडले

# ठाकरे गटाचे मुंबईतले तीन लोकसभा उमेदवार ठरले? विनायक राऊत यांनी थेट नावच सांगितलं...

वृत्तसंस्था/मुंबई

आगामी लोकसभा निवडणुकांच्या दृष्टीने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाने जोरदार तयारी सुरु केली आहे. ईशान्य मुंबई लोकसभा मतदारसंघातून ठाकरे गटाचा उमेदवार ठरला आहे. राष्ट्रवादीचे माजी खासदार आणि सध्या ठाकरे गटात असलेले संजय दिना पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती खासदार विनायक राऊत यांनी दिली आहे. महाविकास आघाडीचे जागावाटप अद्याप नक्की झालेले नाही, परंतु ईशान्य मुंबई लोकसभा मतदारसंघासाठी आमचा आग्रह राहील. ईशान्य मुंबई लोकसभा मतदारसंघातून माजी खासदार संजय दिना पाटील यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याचा आमचा प्रयत्न असेल, त्यांचं कर्तृत्व मोठं आहे, शिवसेनेची शाखाही इथे आहे. त्यामुळे सामोपचाराने, विनंती करुन आम्ही ती जागा मागून घेऊ, असं खासदार विनायक राऊत यांनी सांगितलं.ठाकरे गटाकडून आतापर्यंत गजानन कीर्तिकर यांचे सुपुत्र अमोल कीर्तिकर यांना त्यांच्याच वडिलांविरोधात उत्तर पश्चिम मतदारसंघातून उमेदवारी निश्चित मानली जाते. तर दक्षिण मुंबईतून अरविंद सावंत यांना पुन्हा तिकीट मिळणंही निश्चित आहे. याव्यतिरिक्त ठाकरे गट मुंबईतील कुठली जागा लढवणार का, हे पाहणं उत्सुकतेचं ठरेल.संजय दिना पाटील हे मुंबईतील प्रसिद्ध राजकीय नेते आहेत. २००४ मध्ये पाटील राष्ट्रवादीच्या तिकिटावर मुंबईतील भांडुप विधानसभा मतदारसंघातून आमदारपदी निवडून आले होते. त्यानंतर २००९ मध्ये त्यांना शरद पवारांनी लोकसभेची उमेदवारी दिली आणि ईशान्य पूर्व मुंबई लोकसभा मतदारसंघातून ते निवडूनही आले.२०१४ मध्ये मात्र संजय दिना पाटील यांना पराभवाचा धक्का सहन करावा लागला. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी पाटील यांना पराभवाची धूळ चारली. तर २०१९ मध्ये ते पुन्हा खासदारकीच्या निवडणुकीला उभे राहिले, परंतु भाजप उमेदवार मनोज कोटक यांनी पराभूत केलं. संजय दिना पाटील यांची ज्येष्ठ कन्या राजोल पाटील



गेल्या काही महिन्यांपासून युवासेनेत कार्यरत आहेत. त्यांची युवासेना कार्यकारिणी सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. संजय दिना पाटील आपली जागा परत मिळवत पराभवाचा वचपा काढण्यास उत्सुक आहेत.

# कोरडवाहूला एकरी २५ हजार तर बागायतीला एकरी ५० हजार रुपयांची तात्काळ मदत द्या, नाना पटोलेंचं मुख्यमंत्र्यांना पत्र...



वृत्तसंस्था/मुंबई

राज्यात मागील दोन-तीन दिवसात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीने शेतकऱ्यांचे खूपच नुकसान केले आहे. राज्यातील जवळपास एक लाख हेक्टरवरील पिकांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. शेतकऱ्याची आजची स्थिती पाहता नियम अटी, पंचनामे या प्रशासकीय कामात वेळ न घालवता तातडीने मदत देण्याची गरज आहे. शेतकऱ्यांचे झालेले नुकसान पाहता कोरडवाहू शेतीसाठी एकरी २५ हजार रुपये व बागायती शेतीच्या नुकसानीपोटी एकरी ५० हजार रुपयांची मदत तात्काळ द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

शेतकऱ्यांच्या मदतीसंदर्भात नाना पटोले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवले आहे. या पत्रात ते पुढे असे म्हणातात की, बळीराजा हा सातत्याने संकटाच्या दुष्टचक्रात भरडला जात आहे. यावर्षी कमी पावसाचा मोठा फटका शेतीला बसला आहे, खरिप पुरता वाया गेला आणि आता रब्बी हंगामानेही घात केला आहे. शेतकऱ्याचे हे वर्षच नुकसानीचे ठरले आहे. अवकाळी पाऊस व गारपिटीने शेतातील पिके वाया गेली आहेत.कापूस, तूर, सोयाबीन, कांदा, धान, सोयाबीन, द्राक्षे, आंबा, डाळींब, पपई, केळी, ऊस, संत्रा या पिकांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. राज्यातील १७ जिल्ह्यांतील शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे तर इतर जिल्ह्यातही या अवकाळी पावसाचा फटका पिकांना बसला आहे. विशेषतः विदर्भ, मराठवाडा, खान्देशात या अवकाळीचा मोठा फटका बसल्याचे दिसत आहे. पुणे, नगर, नाशिक जिल्ह्यात गारपिटीने फळबागांचे मोठे नुकसान केले असून भाजीपाल्याचेही नुकसान झाले आहे. शेतकरी जगला तरच आपण जगू, आपली अन्नधान्याची गरज भागवणारा बळीराजा नैसर्गामुळे हतबल झाला आहे. एकीकडे महागाई व दुसरीकडे नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला मदतीचा हात देण्याची नितांत गरज आहे. दुष्काळाचा सामना करत असताना आता अवकाळी व गागपिटीने शेतकरी पुरता हतबल झाला आहे. सरकारने शेतकऱ्याला तात्काळ मदत करुन आधार दिला पाहिजे. पिकविमा कंपन्यांकडूनही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई मिळवून द्यावी, असेही नाना पटोले म्हणाले.




# अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांवर तहसिलदार यांची दंडात्मक कारवाई!

जनसंचलन/ सिंदखेडराजा

तालुक्यातील दुसरबिड येथे अवैध रेती वाहतूक करणारे टॅक्टर तहसिलदार यांनी गुप्त माहितीच्या आधारे पकडुन दंडात्मक कारवाई केली या मध्ये टॅक्टर नंबर २८६६२८ या टॅक्टर मालकाकडून एक लाख सोळा हजार पाचशे रुपये दंड करून शासनाच्या तिजोरीत भर घातली या मुळे रेती वाहतूक करणारे यांना आळा घालण्यासाठी तहसिलदार अनोखी शक्कल करून हे रेती माफिया लोकशन च्या आधारे रेती वाहतूक करता हि कुण कुण लागताच तहसिलदार यांनी क्षणाची हि विलंब न लावता सादर टॅक्टर पकडुन किनगाव राजा पोलिस स्टेशन मधे जमा करुन योग्य ती कारवाई केली या कारवाई मधे रेती वाहतूक करणारे चांगलेच धाबे दणाणले असुन जो कोणी गुप्त माहिती देईल त्याचे नाव गुप्‍त ठेवण्यात येईल असे तहसिलदार प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958